# कर सहायक गट-क परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील** :-

**१.१** राज्य शासनाच्या विक्रीकर विभागातील कर सहायक, गट-क संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

**१.२ पदांचा तपशील** :-

**१.२.१ संवर्ग** : - अराजपत्रित, गट -क

**१.२.२ नियुक्तीचे ठिकाण** :- उमेदवारास महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.

**१.२.३ वेतनबँड** :- **रुपये** ५,२०० - २०,२०० **ग्रेड वेतन** २,४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**१.२.४ उच्च पदावर बढतीची संधी :- ज्येष्ठता व पात्रतेनुसार विक्रीकर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित).**

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे** :-

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण दोन टप्प्यात घेण्यात येते:-

(१) पूर्व परीक्षा-१०० गुण (२) मुख्य परीक्षा- ४०० गुण

**२.२ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व** परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.३** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**३. अर्हता** :-

**३.१** सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने तिच्याशी समकक्ष म्हणून जाहीर केलेली अर्हता

**३.२ टंकलेखन अर्हता** :-

**३.२.१** मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा

**३.२.२** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ नुसार अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता- बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट आणि बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४०शब्द प्रति मिनिट समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

**३.२.३** शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची उपरोक्त टंकलेखन अर्हता मुख्य परीक्षेकरीता अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकास प्राप्त करणे आवश्यक आहे.

**३.३** उमेदवाराला मराठी लिहिणे, वाचणे, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**४. शुल्क (फी)** :-

**४.१** प्रस्तुत परीक्षेकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग | माजी सैनिक |
| (१) | पूर्व परीक्षा | ३७३ | २७३ | २३ |
| (२) | मुख्य परीक्षा | ५२३ | ३२३ | २३ |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. या प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** क्रीमी लेअर संदर्भातील उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५. परीक्षा योजना :-**

**५.१ प्रश्नपत्रिका** :- एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| विषय संकेतांक | विषय | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१३ | मराठी | बारावी | मराठी | १०० | १०० | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | बारावी | इंग्रजी | | | | |
| | सामान्य ज्ञान व बुध्दीमापन चाचणी | पदवी | मराठी | | | | |
| | अंकगणित | दहावी | | | | | |

**५.२ अभ्यासक्रम** - सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | घटक व उपघटक |
|---|---|
| १. | **मराठी :-** व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर. |
| २. | **इंग्रजी :** स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर. |
| ३. | **सामान्य ज्ञान** - दैनंदिन घटना, नेहमीचे अनुभव, धर्म, साहित्य, राजकारण, शास्त्र, सामाजिक व औद्योगिक सुधारणा, क्रीडा या क्षेत्रातील महान व्यक्तींची कार्ये, सर्वसाधारणपणे भारताच्या विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहासाची व भूगोलाची रूपरेषा यांवरील प्रश्न. |
| ४. | **बुध्दिमापन विषयक प्रश्न** - उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न. |
| ५. | **अंकगणित — बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांक व टक्केवारी**. |

**५.३ परीक्षा केंद्र :-**

**५.३.१** खालील ठिकाणी सदर पूर्व परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |
| हिंगोली | २३ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |
| उस्मानाबाद | ३६ |
| परभणी | ३७ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशीम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |
| पालघर | ४७ |
| नवी मुंबई | ४८ |

**५.३.२ उपरोक्त** परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.३.३ उपरोक्त** परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.३.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.३.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**५.३.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या केंद्र अथवा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.३.७** वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**५.४ पूर्व परीक्षेचा निकाल :-**

**५.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.४.२** भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.४.३** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.४.४ प्रत्येक** प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.४.५ अशा** रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.४.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.४.७** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा :-**

**६.१ परीक्षेचे टप्पे :- एक.** लेखी परीक्षा

**६.२ परीक्षेस प्रवेश :-**

**६.२.१ पूर्व** परीक्षेमध्ये अर्हताप्राप्त होणा-या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारास मुख्य परीक्षेकरिता प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.२.३** पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना आयोगाकडे सादर केलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये नंतर कोणत्याही टप्प्यावर टंकलेखन अर्हता वगळता इतर कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

**६.२.४** पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना टंकलेखन अर्हता नसल्यास व टंकलेखन अर्हता मुख्य परीक्षेकरीता आवश्यक अर्ज/ माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला टंकलेखन अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल.

**६.३ परीक्षा योजना :-**

**६.३.१ एकूण गुण :- ४००**

**६.३.२ प्रश्नपत्रिकांची संख्या :- एक.** प्रश्नपत्रिकेचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| विषय संकेतांक | विषय | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२८ | मराठी | बारावी | मराठी | २०० | ४०० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | बारावी | इंग्रजी | | | | |
| | सामान्य ज्ञान व बुध्दिमापन चाचणी | पदवी | मराठी व इंग्रजी | | | | |
| | मूलभूत गणितीय कौशल्य | दहावी | | | | | |
| | पुस्तपालन व लेखाकर्म (Book-Keeping & Accountancy) | बारावी | | | | | |

**६.३.३ अभ्यासक्रम**- सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे :-

मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी, मूलभूत गणितीय कौशल्य आणि पुस्तपालन व लेखाकर्म या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.

| अ.क्र. | घटक व उपघटक |
|---|---|
| १. | **मराठी** :- सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि वाक्यात उपयोग. |
| २. | **इंग्रजी :** Spelling, Common Vocabulary, Punctuation, Expressions, Simple Sentence structure, Grammar, Use of Idioms and phrases & their meaning. |
| ३. | **सामान्य ज्ञान -** |
| | **(३.१) आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास** |
| | **(३.२) महाराष्ट्राचा भूगोल** - पृथ्वी, जगातील नैसर्गिक विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमीनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे, इत्यादी. |
| | **(३.३) नागरीकशास्त्र** - राज्य व्यवस्थापन (प्रशासन), नागरी व ग्रामीण व्यवस्थापन (प्रशासन). |
| | **(३.४) भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या. |
| | **(३.५) पंचवार्षिक योजना** |
| ४. | **चालू घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील |
| ५. | **बुध्दिमापन चाचणी व मूलभूत गणितीय कौशल्य -** |
| | **(५.१) बुध्दिमापन चाचणी** - उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने सदर प्रश्न विचारण्यात येतील. |
| | **(५.२) मूलभूत गणितीय कौशल्य** - (Basic Numeracy/Numerical Skill- numbers and their relations, orders of magnitude, etc. (Class X level) |
| ६. | **अंकगणित - गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांक व टक्केवारी, गुणोत्तर व प्रमाण, वेळ व अंतर, नफा-तोटा, सूट, व्याज, वेळ व काम, आलेख, सरासरी, महत्त्वमापन व क्षेत्रमापन, इत्यादी.** |
| ७. | **पुस्तपालन व लेखाकर्म** (Book-Keeping & Accountancy) — लेखाकर्म अर्थ, लेखा संज्ञा, द्विनोंद पध्दतीची मुलभूत तत्वे, लेखाकर्माकरिता दस्तऐवज, रोजकिर्द, सहाय्यक पुस्तके, खतावणी, बँक मेळजुळणी पत्रक, तेरीज पत्रक, घसारा, अंतिम लेखे, वित्तिय विवरणपत्रके तयार करणे, नफा न कमविणा-या संस्थांची खाती.<br><br>Bookkeeping meaning & definition, Accounting terminology, Fundamentals of Double Entry, Source documents for accounting, Journal, Subsidiary Books, Ledger, Bank Reconciliation Statements, Trial Balance, Depreciation, Final Accounts, Preparing Financial Statements, Accounts of non-profit-making organizations. |

| | |
|---|---|
| ८. | **आर्थिक सुधारणा व कायदे** - पार्श्वभूमी, उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा, केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, WTO तरतुदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, GST., विक्रीकर, VAT. |

**६.४.१** खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेता येवू शकेल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक | केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | **१५** | नागपूर | **३२** |
| मुंबई | **३०** | पुणे | **३८** |

**६.४.२** मुख्य परीक्षा वर नमूद केलेल्या जिल्हाकेंद्रावर अथवा फक्त मुंबई येथे घेण्याबाबतचा निर्णय मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उमेदवारांना अवगत करण्यात येईल.

**६.४.३** परीक्षा वर नमूद केल्याप्रमाणे चार ठिकाणी घ्यावयाचा निर्णय झाल्यास **उपरोक्त** परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.४.४** **उपरोक्त** परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

**६.४.५** विहित पद्धतीने अर्ज/माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.४.६** वर नमूद चार जिल्हाकेंद्रापैकी एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**६.४.७ एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या** केंद्र **अथवा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची** विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**६.४.८** वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**७. लेखी परीक्षेचा निकाल :-**

**७.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**७.२** मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List )तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार किंवा कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार ठरविण्यात येईल.

**७.३** गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू, माजी सैनिक व विकलांग व्यक्ती इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**७.४** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच विकलांग, महिला, माजी सैनिक व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७.५** विकलांग, माजी सैनिक अथवा **अत्युच्च** गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**८. शिफारस :-**

**८.१** "**उमेदवारांना** सर्वसाधारण सूचना" मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**८.२** लेखी परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरिता शतमत (**Percentile**) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या तुलनेत खालीलप्रमाणे किमान शतमत गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशींसाठी विचार करण्यास पात्र असतील :-

(१) अमागास- किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत

(३) विकलांग- किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत

(५) माजी सैनिक-किमान २० शतमत

**८.३** लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे (गुणवत्ता यादीनुसार)उपलब्ध पदांएवढया उमेदवारांची नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**८.४** शिफारसपात्र प्रत्येक उमेदवारास आयोगाकडील नोंदणीकृत क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**९. प्रमाणपत्र पडताळणी :-**

**९.१** शिफारसपात्र उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी सक्षम प्राधिका-याकडून बोलविण्यात येईल.

**९.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे सक्षम प्राधिका-याकडून तपासली जाईल.

**९.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**९.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**९.५** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी सक्षम प्राधिका-याकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच सक्षम प्राधिका-याने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेत घेण्यात येईल. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**९.६** अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका-याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-यांकडून करण्यात येईल.

**********************************************

दिनांक :१५ फेब्रुवारी, २०१७

सु.ह.अवताडे

अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.